आश्विनी भिडे
(भा.प्र.से.)
अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त
(पूर्व उपनगरे)

MUNICIPAL CORPORATION OF GREATER MUMBAI
बृहन्मुंबई महानगरपालिका

अतिरिक्त आयुक्त यांचे कार्यालय,
महापालिका मुख्य कार्यालय, २ रा मजला,
महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
दूरध्वनी कार्यालय : २२६२ ०८०९,
२२६२ ०२५१ विस्ता. ४२१३
फॅक्स : २२६५ ५०३५
ई-मेल : bhide.ashwini@gmail.com
: amc.es@mcgm.gov.in

अ. शा. पत्र क्र. : अति.आ/पू.उ/1896
दिनांक : 18/10/202

प्रति,
श्री. सुधीर पुराणिक
कुलसचिव, मुंबई विद्यापीठ

विषय : मुंबई विद्यापीठांतर्गत महाविद्यालय सुरु करण्या संबंधी मार्गदर्शना बाबत.

संदर्भ : १) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे आदेश क्र. संकीर्ण - २०२१/प्र.क्र. ६/विशि-३ दि. १३.१०.२०२१
२)आपले कडील पत्र क्र.आरईजी/आयसीडी/ २०२१-२२/४४९ दि.१७.०९.२०२१

महोदय,

उपरोक्त विषयांकीत आपले कडील संदर्भिय २ वरील पत्र कृपया संदर्भित करावे.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, 'ब्रेक द चेन' मिशन अंतर्गत वरील संदर्भ क्र. १ अन्वये उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासनाने क्र. संकीर्ण - २०२१/प्र.क्र. ६/विशि-३ दि. १३.१०.२०२१ अन्वये राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयातील नियमित वर्ग सुरु करण्याबाबत आदेश जारी केलेले आहेत. सदर आदेशातील अनुक्रमांक १ व २ मधील सविस्तर मार्गदर्शक सुचना / मानक कार्य प्रणाली (एसओपी) यांचे तंतोतंत पालन करुन महाविद्यालयाचे नियमित वर्ग सुरु करण्यात यावे.

तथापि, राज्य शासनाच्या वरील संदर्भ १ मधील आदेशातील अनुक्रमांक १ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार, बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयांचे वर्ग ५० % क्षमतेने व कोविड प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे संपूर्ण पालन करुन सुरु करण्यात यावेत.

तसेच, राज्य शासनाच्या वरील संदर्भ १ मधील आदेशातील अनुक्रमांक ७ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार, ज्या विद्यार्थी / विद्यार्थीनींनी कोव्हीड- १९ ची लस घेतलेली नाही, त्यांच्याकरीता विद्यापीठाने संबंधित संस्थांचे प्रमुख / महाविद्यालयांचे प्राचार्य यांना संबंधित विभागाचे म.न.पा. सहाय्यक आयुक्त यांच्याशी समन्वय साधून लसीकरणासाठी नजिकच्या लसीकरण केंद्रात किंवा जेथे शक्य असेल तेथे संबंधित महाविद्यालयात विशेष मोहिम राबवून विद्यार्थ्यांचे लसीकरण प्राधान्याने पूर्ण करुन घ्यावे, असे कळवावे.

धन्यवाद.

महानगरपालिका आयुक्त
बृहन्मुंबई महानगरपालिका

**<u>प्रत : सर्व म.न.पा. सहाय्यक आयुक्त यांना</u>**

सर्व विभागनिहाय म.न.पा. सहाय्यक आयुक्त यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य व परिसंस्थांच्या संचालकांशी समन्वये साधून विद्यार्थ्यांचे लसीकरण प्राधान्याने पूर्ण करुन घ्यावे.

महानगरपालिका आयुक्त
बृहन्मुंबई महानगरपालिका